Shri Chhatrapati Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# Shivaji Arts, Commerce and Science College Kannad

## Dist. Aurangabad (MS) 431103

NAAC Reaccredited B++ CGPA (2.92)

Department of History and

Icons and Sculptures Research Foundation, Aurangabad

Organized Two Days 2nd Annual National Conference on

# Sculpture, Art and Architecture

## CERTIFICATE

This is to certify that Mr./Mrs./Dr. संजय वाकळे of ... has participated / presented research paper entitled कन्नड तालुक्यातील दुर्लक्षित अंतूर किल्याचा अभ्यास ... in Two Days National Conference Organized by Department of History and Icons & Sculptures Research Foundation on the theme ***Sculpture, Art and Architecture*** on 25th & 26th March 2022 at Shivaji Arts, Commerce and Science College, Kannad, Dist. Aurangabad.

| Dr.P.B.Mahajan<br>Convener<br>Department of History | Dr.Sanjay Paikrao<br>Secretary<br>Icons and Sculptures Research Foundation | Dr.Z.A.Pathan<br>President<br>Icons and Sculptures Research Foundation | Dr.V.N.Bhosale<br>Principal<br>Shivaji College, Kannad |
| --- | --- | --- | --- |

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण


वर्ष १२ वे, अंक – चौथा; जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२२

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३.
मो. ९९०४००३९९८

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे शीर्षक / लेखकाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| 1. | प्राचीन भारतीय मूर्तिकला निर्मितीची साधने<br>- डॉ. सीमा नवनाथ इंदलकर | 1 - 5 |
| 2. | मार्कंडा मंदिराचा ऐतिहासिक अभ्यास<br>- प्रा. जयवंत एन. काकडे | 6 - 12 |
| 3. | मराठवाड्यातील मंदिर स्थापत्यातील मूर्ती व शिल्प<br>- डॉ. आर आर पिंपळपल्ले - सोनाळे सरस्वती निवृत्ती | 13 - 18 |
| 4. | हेमाडपंती मंदिरांची स्थापत्य शैली<br>- प्रा.डॉ. कोंडेकर आर. एस. | 19 - 23 |
| 5. | अजिंठ्यातील भित्तीचित्रामध्ये दडलेला निवडक जातककथांचा नाट्यपूर्ण कथाविस्तार : एक अभ्यास<br>- डॉ. वैशाली केशव बोदेले | 24 - 28 |
| 6. | राजा गंधर्वसेनाच्या मूर्तीची वास्तविकता एक अभ्यास<br>- डॉ. अस्मिता हवालदार | 29 - 36 |
| 7. | मानसपूरी (कंधार) येथील मूर्ती शिल्पातील भव्यशिल्प : भैरव क्षेत्रपाल - डॉ. राजाराम रा पिंपळपल्ले | 37 - 40 |
| 8. | शिवकालीन किल्ले व किल्ले व्यवस्थापन<br>- प्रा. डॉ. विद्यासागर पू. सोनकांबळे | 41 - 43 |
| 9. | मुघल स्थापत्यकलेचा उत्कृष्ट भव्य नमुना - हुमायूँचा मकबरा<br>- डॉ. अनिता शिंदे | 44 - 47 |
| 10. | मराठेकालीन किल्ले स्थापत्यशास्त्र<br>- डॉ. शिला कमलाकर स्वामी | 48 - 50 |
| 11. | स्थापत्य शास्त्राचा उत्कृष्ट नमुना - किल्ले सोलापूर<br>- श्रीमती मंजुषा कमलाकर स्वामी | 51 - 53 |
| 12. | चलनी नाण्याचा उगम<br>- श्री शैलेश सदाशिव सावे | 54 - 59 |
| 13. | कन्नड तालुक्यातील दुर्लक्षित अंतूर किल्ल्याचा अभ्यास<br>- प्रा. डॉ. संजय वाकळे | 60 - 63 |
| 14. | सिंधू संस्कृतीकालीन- शिल्पकला / मुर्तीकला<br>- प्रा.डॉ.युलिसिस एकनाथ भालेराव | 64 - 67 |



# कन्नड तालुक्यातील दुर्लक्षित अंतूर किल्ल्याचा अभ्यास

- प्रा. डॉ. संजय वाकळे
इतिहास विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय
चिंचोली (लि), ता. कन्नड, जि. औरंगाबाद,

मराठवाड्याचा भूगोल हा प्रचंड मोठ्या इतिहासाचा साक्षीदार आहे अजिंठा, वेरूळ लेण्या. व घृणेश्वर मंदिर बीबीका मकबरा, पानचक्की, खुलताबाद. यासारख्या ऐतिहासिक पर्यटन स्थळा बरोबरच औरंगाबाद जिल्ह्यातील किल्ल्यामध्ये अजूनही 'दौलताबाद किल्ला एकमेव आकर्षण आहे. परंतु औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा ते वेरूळ च्या डोंगर भागात यांच्या तोडीस तोड अंतुर किल्ला. वेताळवाडीचा किल्ला, लोहगड नांद्रा, भांगशीमाता, सुतोंडा, राहीलगड, मस्तगड, तालत्तम असे तब्बल आठ दुर्लक्षित गड किल्ले आहेत. यांची माहिती नसल्याकारणाने येथे पर्यटक फिरकतही नाही. काळाच्या ओघात हे किल्ले दुर्लक्षित झाले. पुरातत्व खाते साठी ही त्यांची ऐतिहासिक वास्तू तेवढीच किंमत उरली आहे. यापैकीच एक असलेला अंतुरचा किल्ला.

औरंगाबाद जिल्ह्यातील पितळखोरा ते अजिंठा या पूर्वपश्चिम पसरलेल्या सातमाळा डोंगर रांगेत अनेक परिचित-अपरिचित किल्ले आहेत. महाराष्ट्राचा पर्यटन जिल्हा अशी ओळख असलेल्या या जिल्ह्यात मुख्य पर्यटन ठिकाणे व त्यांना जोडणारे काही महामार्ग सोडले तर रस्त्याच्या बाबतीत भयानक स्थिती आहे त्यामुळे या किल्ल्याकडे कोणी फिरकत नाही. तालुक्यात अंतुर किल्ला हा असाच एक तटबंदी असलेला किल्ला. औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यात सुमारे२५ किमी अंतरावरील नागापूर गावच्या उत्तर दिशेला २० अंश २५'४३.५"उ अक्षांश आणि ७५ अंश १४'०७.५"पु. रेखांशावर तसेच एका डोंगरावर अंतुर किल्ला वसलेला आहे.

**संशोधनाचा उद्देश :**

- कन्नड तालुक्यातील दुर्लक्षित अंतूर किल्ल्याच्या इतिहासाचा सखोल अभ्यास करणे.

**अंतूर किल्ल्याचा इतिहास :**

अंतुरचा किल्ला हा पंधराव्या शतकात एका मराठा सरदाराने बांधला होता असे सांगितले जाते. चिमणापूर गावातील 96 कुळी मराठा पुत्राचे नाव रविराव शामराव ढोणे. असे जुन्या लोकांनी सांगितले. अंतुर किल्ले किल्लेदार

सुमारे सोळा शेंदुरी असे असून हे सुमारे शतकापर्यंत त्यांच्या वंशाच्या ताब्यात राहिले आणि त्यानंतर मोहम्मदांनी ताब्यात घेतले. सोळाव्या आणि सतराव्या शतकाच्या दरम्यान ते अहमदनगरच्या निजामशाहीचे होते. या किल्ल्यातील शिलालेखा पैकी पुष्कळ शिलालेख सापडले आहेत.परिसरातील इतर किल्ल्याप्रमाणे अंतूर किल्ल्याच्या निर्मितीबद्दल आपल्याला याहून अधिक माहिती मिळत नाही.

नागापूरहून येतांना दिसणाऱ्या दगडी खांबावरील दिशादर्शक फारसी शिलालेख, किल्ल्याच्या तिसर्या दरवाजावरील मलिक अंबरचा लेख आणि मशिदीवरील शिलालेख सोळाव्या शतकात आणि सतराव्या शतकाच्या सुरुवातीला अहमदनगरच्या निजामशाही राज्यात किल्ला होता हे दर्शवितात. पुढे अंतुरजवळ मुघल सरदार दिलेरखान आणि मराठे यांच्यामध्ये मोठी लढाई झाल्याचे उल्लेखही इतिहासात सापडतात. परिसरातील इतर किल्ल्यासारखी अंतूर किल्ल्या वरील मुघल आणि पुढे हैदराबादच्या निजाम काळातील अधिक माहिती आपल्याला मिळत नाही.इ.स.1820 च्या सुमारास मराठा विरुद्ध शेवटच्या मोहिमेत ब्रिटिशांनी निजामाच्या संयुक्त सैन्यापुढे अंतुरच्या किल्ल्याने शरणागती पत्कारली. मुघल काळापासून किल्लेदारी एका राजपूत घराण्याकडे असल्याची नोंद आहे.

**अंतुर किल्ल्याची रचना :**

अंतुर किल्ल्याला सर्व बाजूनी डोंगराच्या नैसर्गिक उभ्या कातळामुळे या गिरिदुर्गाला भक्कम संरक्षण लाभले आहे. काही ठिकाणी हा कातळ मानवनिर्मित असावा असेही लक्षात येते. किल्ल्याची तटबंदी अजूनही बऱ्याच प्रमाणात उभी आहे. नागापूर कडून गाडीमार्गाने आले की तिहेरी तटबंदिने अभेद्य झालेला गोलाकार बुरुज आपल्याला दिसतो. डोंगर रांगेतून किल्ल्यांना वेगळे करण्यासाठी खिंड खोदून त्यावर हा बुरुज बांधलेला आहे. मुख्य दरवाजाकडे जाणारी वाट हया बुरुजाच्या उजव्या अंगाने जाते. एकमेकांशी काटकोन साधणारी तीन दरवाजे आणि त्या अनुषंगाने वळणावळणाने जाणारा मार्ग किल्ल्याच्या संरक्षण रचनेचा भाग आहेत. किल्ल्याच्या मध्यभागी एक टेहाळणी बुरुज आहे. तोफा ठेवण्याची व्यवस्था केलेली दिसते.

प्रवेशाचा मार्ग चढून वर आल्यावर किल्ल्याच्या मध्यभागी एक मोठा बंदिस्त तलाव आहे. तलावाच्या पूर्व दिशेला एक कमानेची बांधणी आहे. तलावाच्या उत्तरेला इमारतीचे अवशेष दिसतात. त्यांचे घुमट कार छत १५-१६ व्या शतकातील निजामकालीन वास्तुशैलीची सामर्थ्य दाखवते. किल्ल्यावरील तलावाच्या शेजारील मशिद दर्गाह व काही थडगी अशा धार्मिक इमारती आहेत. किल्ल्यात प्रवेश यापूर्वी ज्या मोठ्या बुरुजाला फेरी मारून आपण दरवाज्याकडे मार्गस्थ होतो. या बुरुजावर जाण्यासाठी मार्गावर जाताना तळघर असलेल्या इमारतीचे अवशेष आणि एक भव्य दरवाजा पाहायला मिळतो. सेनेच्या हया बुरूजामध्ये पारेकर्यासाठी. बेवड्या आणि एक फिरा चा दर्गा आहे.

त्याकाळी किल्ल्यावरील पाण्याची गरज भागवण्यासाठी मोठा तलाव बांधण्यात आलेला आहे. तसेच किल्ल्याच्या डाव्या अंगाला असलेली पाण्याची टाकी खोदण्यात आलेली आहे. या टाकीतून पाण्याची तहान भागवत असणार असे दिसून येते. अनेक इमारतीचे आणि संरक्षण रचनेचे अवशेष इतक्या मोठ्या प्रमाणावर अजूनही अंगावर बाळगून असणारा ह्या किल्ल्याला अजिंठा सातमाळा डोंगररांगा मधील दुर्गराज असे म्हणून नावाजले जाते.

**किल्ल्याची वैशिष्ट्ये :**

किल्ला ज्या टेकडीवर आहे तो डोंगर रुपाने चौरस आणि परीघाच्या आसपास एक मैलावर आहे. त्यास तीन बाजूस सुमारे ७०० फूट उंचीचा नैसर्गिक स्कार्प आहे. तर दक्षिणेस कृत्रिम रित्या धारदार बनलेला आहे. अंतराअंतरावर बुरुज असणाऱ्या दोन दगडाच्या भिंती एकमेका पासून थोड्या अंतरावर टेकडीच्या कपाळा भोवती पसरतात आणि प्रवेशद्वाराच्या कडेला सागवान लाकडाच्या फाटकाचे रक्षण होते.

**किल्ल्यावरील पाहण्यासारखी ठिकाणे :**

अंतूरच्या पूर्व अंगाला असणाऱ्या काड्यांच्या पोटात दक्षिणेकडे तोंड करून एक प्रक्षणीय दरवाजा आहे अरुंद जागेत दरवाजा असल्यामुळे तो समोर गेल्याशिवाय पटकन् आपणास दिसत नाही. येथे दरवाजाच्या बाहेर पारेकर यांच्या जागा आहेत. काही वर्षापूर्वी पर्यंत (१९९०) पर्यंत या दरवाजाला लाकडी दारे होती. ती आता बेपत्ता झाली आहेत. या दारातून आत गेल्यावर आतील मार्ग तटबंदीने बंदिस्त केलेला असून तो अरुंद आहे. या मार्गावर वरून खूपच दगड पडलेली आहेत. पुढचा दरवाजा मात्र पुर्व दिशेला तोंड करून आहे हा भव्य दरवाजा आहे. दुसऱ्या दरवाजाच्या आतील बाजूच्या कमानीवर शिल्पे आहेत. अशी शिल्पे अनेक ठिकाणी पहावयास मिळतात. पण येथे या शिल्पा बरोबर सजावटीसाठी तोफेचे चार गोळे वापरलेले आहेत अशा प्रकारे केलेली सजावट महाराष्ट्रात किंवा महाराष्ट्राबाहेरही आढळत नाही. वैशिष्ट्यपूर्ण सजावट पाहून आपण तिसऱ्या दरवाजावरील भव्य असा फारशी शिलालेख अवलोकन करून गड प्रवेश करायचा. हा प्रवेश गडाच्या मध्यभागीच होतो.

गड दक्षिणोत्तर पसरलेला असून तटबंदीने वेष्टित आहे. या तटबंदीच्या कडेने उत्तर टोकाकडे चालू लागल्यास उजवीकडील तटबंदी मधील काही बुरूज लागतात. डावीकडे एक टेकडी असून टेकडीच्या दक्षिण बाजूला भलामोठा तलाव आहे. टेकडीच्या उतारावर भव्य इमारत आहे. इमारतीच्या गच्चीवर जाता येते. त्यासाठी पायऱ्या आहेत. शेगडीच्या माथ्यावर टेहाळणीकरिता भला मोठा चौथरा बांधलेला असून त्यावर चढण्यासाठी उत्तरेकडून पायऱ्या आहेत. या चौथऱ्यावर ऊन संपूर्ण गडावर लक्ष ठेवता येते. तसेच येथून अजंठा- सातमाळा रांगेचे उत्तम दर्शन होते. उत्तरेकडील खानदेशाचा परिसर न्याहाळता येतो. गडाचा दक्षिण भाग एका तटबंदीने वेगळा केलेला आहे या तटबंदीमध्ये तीन दरवाजे आहेत त्यापैकी मध्यभागी मोठा दरवाजा असून त्याला दक्षिण बाजूला दोन मोठे बुरुज आहेत. मधल्या टेकडीच्या पश्चिम उतारावर तटबंदीजवळ पाण्याचे टाके कोरलेले आहे. कडाचा उत्तर भाग बालेकिल्ल्याचासारखा असून तो अधिकच भक्कम करण्यात आला आहे. ह्या बाजूला किल्ला हा डोंगर रांगेची जोडला गेला असल्यामुळे या बाजूला मोठा खंदक कोरलेला आहे खंदकाच्या माथ्यावर भक्कम तटबंदी असून या तटबंदीला चिलखती बांधणी आहे. तिथे एक तोफ पडलेली आहे.

**अंतूर किल्ल्यावर जाण्यासाठी मार्ग :**

अंतुर किल्ल्यास थेट जमिनीवरुन भेट देण्यासाठी आपल्याला नागापूर किल्ल्याजवळील गाव गाठावे लागते. येथील रस्त्यांची भयानक अवस्था पाहता मुंबई पुण्याहुन येथे जाताना चाळीसगाव मार्गे जाणे हा बऱ्यापैकी पर्याय आहे. चाळीसगाव नागापूर हे अंतर जवळपास ४२ कि मी असून चाळीसगाव- नागापूर- खोलापुर या मार्गाने किल्ल्याच्या पायथ्या पर्यंत जाता येते. औरंगाबादहुन वेरूळ- कन्नड मार्गे नागापूर येथे येण्यास 2.5 तास इतका वेळ लागतो. वाहनांची सोय केवळ नागापूर पर्यंत असल्याने स्वतःचे वाहन नसल्यास नागापूर -खोलापुर ते अंतुर किल्ला सहा कि.मी चे अंतर पायी जावे लागते. पिक्चर पण किल्ला चालण्याचे श्रम वाचून कमी वेळात गडावर जाता येते. या वाटेने किल्ला आपल्याला दिसत नाही. अगदी जवळ जाईपर्यंत किल्ला आपल्याला दिसत नाही. कोल्हापूर कडून गडावर जाताना एक वाटेत एका ठिकाणी ६ फूट उंचच चार शहरांच्या दिशा व अंतर दर्शविणारा पर्शियन भाषेत कोरलेला मैला चा चौकोनी स्तंभ दिसून येतो. हा स्तंभ इ.स.१६०८मध्ये बसविल्याचा त्यावर उल्लेख आहे.

भारतात अस्तित्वात असणाऱ्या मैलांच्या दगडावरील हा एक प्राचीन ठेवा आहे. त्याचे जतन व्हायला हवे. रस्त्याच्या पुढील भागात एका चढावर उजव्या बाजूला उघड्यावर ठेवलेली मारुतीची मूर्ती पाहायला मिळते. वाटेने जाताना शांतता बाळगल्यास वन्य प्राणी आपल्याला दर्शन देऊन जातात. वाटेत वनखात्याने काही ठिकाणी सिमेंटचे निवारे बांधलेले असून रस्त्याच्या शेवटच्या टप्प्यात तीन खोल्या बांधल्या आहेत. येथून आपल्याला अंतुर किल्ल्याचे पहिले दर्शन होते. वाटेच्या डाव्या बाजूला असलेल्या टेकडीवर एक गोल घुमट असलेली पुरातन वास्तू दिसते. येथून

काही अंतरावर किल्ल्याकडे जाणारा रस्ता संपतो व पायवाटेला सुरुवात होते. किल्ला पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत असल्याने गडावर खूप मोठ्या प्रमाणात संवर्धनाचे काम झालेले असून गडावर जाणारी पायवाट दगडांनी बांधून काढलेली आहे.

**सारांश:**

औरंगाबाद जिल्ह्यातील अजंठा वेरूळ लेण्या ह्या जागतिक दर्जाची पर्यटनस्थळे आहेत. येथे परदेशी पर्यटकांची नेहमीच वर्दळ असते. एक परदेशी पर्यटन हा सात लोकांना रोजगार देतो. कन्नड तालुक्यातील अंतूर किल्ला हा दुर्लक्षित राहिल्यामुळे त्याला तितकीशी प्रसिद्धी मिळालेली नाही. परंतु या किल्ल्याची रचना लक्षात घेतल्यानंतर हा किल्ला पर्यटकांच्या दृष्टीने महत्त्वाचा होऊ शकतो. या किल्ल्याची अधिक योग्य माहिती मिळावी यासाठी येथे माहिती फलकाची आवश्यकता आहे. त्याच्या बऱ्याच भागात रस्त्या अभावी जाता येत नाही. त्या साठी योग्य निगा आणि मार्गदर्शक फलकांची व्यवस्था केल्यास पर्यटकांची संख्या नक्कीच वाढेल आणि स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होईल. काही ठराविक पर्यटन स्थळा वरच नेहमी पर्यटकांची गर्दी असते जितकी जास्त पर्यटन स्थळे विकसित होतील. तितका पर्यटन वर्ग विभागला जाईल. पर्यटनाला अधिक पर्याय उपलब्ध होतील. शासनाचे प्रयत्न आणि स्थानिक लोकांचा सहभाग यातून या वास्तूचे हरवलेले वैभव परत मिळवून देण्यास मदत होईल.

**संदर्भः-**


१) प्रमोद मांडे 'गड किल्ले महाराष्ट्राचे', मराठी देशा फाउंडेशन, कोल्हापूर

२) https.//www.discovermh.com

३) https//mr.m.wikipedi.org.wiki

४) विकिपीडिया

५) https.//www.statuscentury.in.antur

६) https.//www.citykatta.com antur fort


◆◆◆◆

